| MHPA100004092020 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | खटला दाखल दिनांक | : | ०६/११/२०२० | | |
| | खटला नोदंणी दिनांक | : | ०६/११/२०२० | | |
| | खटला निकाल दिनांक | : | २१/११ /२०२५ | | |
| | निकाल कालावधी | : | वर्ष ०५ | महिना ०० | दिवस १५ |
| | **निशाणी क्रमांक** | : | | | |

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश गंगाखेड यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी डी. डी. कुरुलकर, अतिरिक्त सत्र न्यायाधीश गंगाखेड )**

**सत्र खटला क्रमांकः ४२/२०२०**

**(पोलीस ठाणे – नवा मोंढा, परभणी येथील गुन्हा नोंद क्र. १६/२०१३, भारतीय दंड विधानचे कलम १४३, १४७, ३५३, ३३२, ३३६, ४२७ सह कलम १४९, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, कलम ७ फौजदारी कायदा सुधारणा कायदा व कलम १३५ मुंबई पोलीस कायदा.**

| | | |
|---|---|---|
| सरकार पक्ष/ फिर्यादी | : | महाराष्ट्र शासन,<br>मार्फतः पोलीस ठाणे अधिकारी,<br>नवा मोंढा पोलीस ठाणे, परभणी. |
| | | |
| सादरकर्ते | : | सहायक सरकारी अभियोक्ता,<br>श्री एस.डी. वाकोडकर |
| | | विरुध्द |
| **आरोपी** | १. | सुभाष उर्फ पप्पू पि. जर्नादिन सावंत<br>वय- २५ वर्ष, धंदा - चालक,<br>रा. शिवाजी नगर, मानवत, जि. परभणी. |
| | २. | परमेश्वर उर्फ पिंटू मुरलीधर फल्ले,<br>वय- २७ वर्ष, धंदा - मजुरी,<br>रा. शिवाजी नगर, मानवत, जि. परभणी. |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | ४ | संदिप पि. प्रभाकर बुरकूले,<br>वय- २८ वर्ष, धंदा - हॉटेल,<br>रा. शिवाजी नगर, मानवत, जि. परभणी. |
| | ५ | संजय पि. गणेशराव जाधव,<br>वय- ३८ वर्ष, धंदा - नौकरी,<br>रा. पंचवटी कॉलनी, मानवत, जि. परभणी |
| | ६ | अशोक पि. आबाराव सिसोदिया,<br>वय- ४४ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. शिवाजी नगर, मानवत, जि. परभणी |
| | ७ | इंदरसिंग पि. जगदिशसिंग टाक,<br>वय- ३५ वर्ष, धंदा - व्यवसाय,<br>रा. गुरू गोविंदसिंग नगर, परभणी, ता व जि. परभणी. |
| | ८ | दिपक पि. कूंडलिक नन्नावरे,<br>वय- ३० वर्ष, धंदा - चालक,<br>रा. धर्मापूरी, ता व जि. परभणी |
| | १० | त्रिंबक पि. लक्ष्मणराव मोगरे,<br>वय- ४८ वर्ष, धंदा - चालक,<br>रा. सिंधीखाना, मानवत, ता. मानवत जि. परभणी |
| | १२ | सुरेंद्र पि. दत्तात्रय नेब,<br>वय- ४८ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. शेलगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी |
| | १३ | मनोहर पि. श्रवण भालेराव,<br>वय- ४४ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. रमाबाई अंबेडकर नगर, परभणी |
| | १४ | जितेंद्र पि. लक्ष्मणराव देशमुख,<br>वय- ४३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. पेडगाव, ता. व जि. परभणी |
| | १५ | भारत पि. रंजीतराव रेंगे,<br>वय- ४३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. जांब, ता. व जि. परभणी |
| | १६ | अशोक पि. मुंजाभाउ भोसले,<br>वय- ३५ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. वडगाव सुक्रे, ता. व जि. परभणी |

| | | |
|---|---|---|
| | १७ | संतोष पि. बालाजी गलबे,<br>वय- २९ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. दत्त मंदिरा जवळ, मानवत,<br>ता. मानवत, जि. परभणी |
| | १८ | मधुकर पि. मारोतराव निरपणे,<br>वय- ५१ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. लिंबगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी |
| **आरोपी** | १९ | भगवान पि. रंगराव कच्छवे,<br>वय- ४३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. दैठणा, ता. व जि. परभणी |
| | २० | आत्माराम पि. ज्ञानोबा वाघ,<br>वय- ३३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. पोखर्णी ता व जि. परभणी |
| | २१ | पंडित उर्फ बंडू सदाशिवराव देशमुख,<br>वय- ४३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. शहापुर, ता व जि. परभणी |
| | २२ | देविदास पि. रामचंद्र कच्छवे,<br>वय- ४१ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. दैठणा, ता. व जि. परभणी |
| | २३ | पंढरीनाथ पि. शंकरराव घूले,<br>वय- ४६ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. मांडाखळी, ता. व जि. परभणी |
| | २४ | अरूण पि. बालासाहेब घाटगे,<br>वय- ४५ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. सालापूरी, ता. व जि. परभणी |
| | २५ | दत्तात्रय पि. ज्ञानोबा जाधव,<br>वय- ३२ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. भोसा, ता. मानवत, जि. परभणी |
| **आरोपी** | २६ | श्रीनिवास पि. सुधिरराव रेंगे,<br>वय- ३३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. जांब, ता. व जि. परभणी |
| | २८ | सखुबाई विठ्ठल लटपटे,<br>वय- ५५ वर्ष, धंदा - घरकाम,<br>रा. संत जनाबाई नगर, गंगाखेड,<br>ता. गंगाखेड, जि. परभणी |

| | | |
|---|---|---|
| | २९ | वनिता रमेश कदम,<br>वय- ३९ वर्ष, धंदा - घरकाम,<br>रा. लोहगाव, ता. व जि. परभणी |
| | ३० | रमेश पि. सोपानराव मगर,<br>वय- ४३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. खेर्डा, ता. पाथरी, जि. परभणी |
| | ३१ | मोहन पि. सखाराम उफाडे,<br>वय- ३० वर्ष, धंदा - मजुरी,<br>रा. गणेश नगर, सोनपेठ, ता. सोनपेठ,<br>जि. परभणी |
| | ३२ | महादू पि. ज्योतीबा भूजबळ,<br>वय- ४० वर्ष, धंदा - मजुरी,<br>रा. नारायण नगर, मानवत, ता. मानवत,<br>जि. परभणी. |
| | ३३ | बळीराम पि. दगडोबा नवघरे,<br>वय- ३८ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. मुदगल, ता. पाथरी, जि. परभणी |
| | ३४ | रामचंद्र पि. नामदेव आम्ले,<br>वय- ३५ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. खेर्डा, ता. पाथरी, जि. परभणी |
| | ३५ | रविंद्र पि. रामकिशन धर्मे,<br>वय- ४० वर्ष, धंदा - शेती,<br>रा. लोणी, ता. पाथरी, जि. परभणी |
| | ३६ | अर्जुन पि. सुभाषराव सामाले,<br>वय- २५ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. कुंभकर्ण टाकळी, ता. व जि. परभणी |
| | ३८ | मिराताई कल्याणराव रेंगे,<br>वय- ५२ वर्ष, धंदा - एम.एल.ए.<br>रा. जांब, ता. व जि. परभणी |
| | ३९ | कल्याणराव पि. बंन्सीधरराव रेंगे,<br>वय- ५३ वर्ष, धंदा - शेती,<br>रा. जांब, ता. व जि. परभणी |
| | | |
| सादरकर्ते | : | श्री एस. ए. बागल, विधिज्ञ. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | २१/०१/२०१३ |
| फिर्याद दाखल तारीख | : | २१/०१/२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | ०६/०४/२०१५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | | १६/०३/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २५/०९/२०२५ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | : | २०/११/२०२५ |
| निकालाची तारीख | : | २०/११/२०२५ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेलतर. | : | -- |

| आरोपीचा अनुक्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष उर्फ पप्पू पि. जर्नादन सावंत | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | भा.द.वि. कलम १४३,१४७,३५३, ३३२,३३६,४२७ सह कलम १४९, कलम ३ सा.मा. नु.प्र.कायदा, कलम ७ क्रि.लॉ. अ. अॅक्ट व कलम १३५ मुं. पो. कायदा. | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २ | परमेश्वर उर्फ पिंटू | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुरलीधर फल्ले | | | | | | |
| ४ | संदिप पि. प्रभाकर बुरकूले | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ५ | संजय पि. गणेशराव जाधव | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ६ | अशोक पि. आबाराव सिसोदिया | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ७ | इंदरसिंग पि. जगदिशसिंग टाक | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ८ | दिपक पि. कूंडलिक नन्नावरे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १० | त्रिंबक पि. लक्ष्मणराव मोगरे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १२ | सुरेंद्र पि. दत्तात्रय नेब | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १३ | मनोहर पि. श्रवण भालेराव | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १४ | जितेंद्र पि. लक्ष्मणराव देशमुख | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १५ | भारत पि. रणजीतराव रेंगे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १६ | अशोक पि. मुंजाभाउ भोसले | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १७ | संतोष पि. | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | | निर्दोष | ---- | ---- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बालाजी गलबे | | | --”-- | मुक्त | | |
| १८ | मधुकर पि. मारोतराव निरपणे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| १९ | भगवान पि. रंगराव कच्छवे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २० | आत्माराम पि. ज्ञानोबा वाघ | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २१ | पंडित उर्फ बंडू सदाशिवराव देशमुख | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २२ | देविदास पि. रामचंद्र कच्छवे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २३ | पंढरीनाथ पि. शंकरराव घूले | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २४ | अरूण पि. बालासाहेब घाटगे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २५ | दत्तात्रय पि. ज्ञानोबा जाधव | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २६ | श्रीनिवास पि. सुधिरराव रेंगे | २२/०१/२०१३ | २५/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २८ | सखुबाई विठ्ठल लटपटे | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| २९ | वनिता रमेश कदम | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --”-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | रमेश पि. सोपानराव मगर | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३१ | मोहन पि. सखाराम उफाडे | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३२ | महादू पि. ज्योतीबा भूजबळ | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३३ | बळीराम पि. दगडोबा नवघरे | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३४ | रामचंद्र पि. नामदेव आम्ले | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३५ | रविंद्र पि. रामकिशन धर्मे | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३६ | अर्जुन पि. सुभाषराव सामाले | २८/०१/२०१३ | २८/०१/२०१३ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३८ | मिराताई कल्याणराव रेंगे | २४/०९/२०१४ | २४/०९/२०१४ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |
| ३९ | कल्याणराव पि. बंन्सीधरराव रेंगे | २४/०९/२०१४ | २४/०९/२०१४ | --"-- | निर्दोष मुक्त | ---- | ---- |

## अ- सरकार पक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र-१ | नंदकुमार उर्फ आबा श्रीधरराव टाकळकर | घटनास्थळ पंच |
| सा.क्र-२ | सुर्यकांत शांतीनाथ अंबूरे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र-३ | सुनिल पांडुरंगराव जैतापुरकर | फिर्यादी |
| सा.क्र-४ | अमोल शिवाजीराव शिरसकर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र-५ | पिंटू किशनराव बोकन | घटनास्थळ पंच |
| सा.क्र-६ | अर्चना सुदाम नरवाडे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार / जखमी |
| सा.क्र-७ | माणिक मल्हारी खिल्लारे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र-८ | तानाजी भिवा दराडे | तपासीक अधिकारी |

**ब- बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| बचाव पक्षाचे सा.क्र-१ | तपासले नाही. | -- |

**क- न्यायालयाचे साक्षीदार**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| कोर्ट सा.क्र-१ | तपासले नाही. | -- |

**अ- सरकार पक्षाचा कागदोपत्री पुरावा**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी पी-११२ | फिर्याद |
| २. | निशाणी पी-१२२ | अमोल शिरसकर यांच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग |
| ३. | निशाणी पी-१२३ | माणिक खिल्लारे यांच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग |
| ४. | निशाणी पी-१२४ | जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी येथे पाठविलेले पत्र |
| ५. | निशाणी पी-१२५ ते पी-१६२ | अटकेचे पंचनामे |

| | | |
|---|---|---|
| ६. | निशाणी पी-१६३ ते पी-१६९ | जखमींचे जखमांचे प्रमाणपत्र |

**ब- बचाव पक्षाचा कागदोपत्री पुरावा**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

**क- न्यायालयाचा कागदोपत्री पुरावा**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

**ड- मुद्देमाल/वस्तू**

| अ.क्र | मुद्देमाल/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

## न्यायनिर्णय

**( आज दिनांक – २० नोव्हेंबर, २०२५ रोजी अधिघोषीत )**

१. आरोपीच्या विरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३५३, ३३२, ३३६, ४२७ सह कलम १४९, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, कलम ७ फौजदारी कायदा सुधारणा कायदा व कलम १३५ मुंबई पोलीस कायदा नुसार खटला चालवण्यात आला. आरोपी क्र.९ हे मयत असल्याचा अहवाल पोलीसांनी दिल्यामुळे त्यांचे विरूध्दची केस स्थगित करण्यात आली असा आदेश नि.१ वर करण्यात आला. खटला चालु असतांना आरोपी क्र. ३, ११, २७ व ३७ हे गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या विरूध्द अजामीनपात्र वॉरंट जाहिर प्रगटन काढण्यात आले. परंतु त्यानंतरही आरोपी मिळुन न आल्याने त्यांना फरार घोषीत करून इतर आरोपींची केस ही त्यांच्या पासुन स्वतंत्र करून चालवण्यात यावी असा आदेश नि.१ वर पारीत करण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात केस अशी आहे की,**

२- आरोपी क्र. ३८ आमदार श्रीमती मीराताई रेंगे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २१/०१/२०१३ रोजी मार्केट यार्ड येथून जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी असा मोर्चा मुदगल येथील पाटबंधा-यातुन पाणी सोडण्याच्या निषेधार्थ आयोजित करण्यात आला होता. सदर मोर्चा त्यादिवशी पालकमंत्री यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक बी रघुनाथ सभागृह, परभणी येथे आयोजित केल्याची पार्श्वभूमी वरती काढण्यात आला होता. मोर्चा शिवसेना कार्यकर्ते काढणार होते. विभागीय पोलीस अधिकारी, परभणी यांनी बंदोबस्ताचे आदेश पारित केले होते. फिर्यादी स्वतः तसेच एक आरसीपी प्लाटून व दोन स्ट्रायकिंग प्लाटून व इतर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा बंदोबस्तासाठी हजर होते. नियोजित मोर्चा आमदार मीराताई रेंगे यांच्या नेतृत्वाखाली मार्केट कमिटी नवा मोंढातून निघून दुपारी ०१.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे आला. सदर मोर्चामध्ये अंदाजे ८०० ते ९०० शिवसैनिक सहभागी होते. परंतु मोर्चा मधील लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी न जाता शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास हार घालून येतो असा बहाना करून पुतळ्याकडे निघाले. फिर्यादी आणि उपस्थित पोलीस अधिकारी यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांचा निर्देश न जुमानता मोर्चा मधील लोक पुतळ्याकडे हार घालण्याच्या बहाण्याने गेले. पोलीस अधिकारी, कर्मचारी सुद्धा पुतळ्याकडे गेले. पुतळ्यास हार घातल्यानंतर २०० ते २५० मोर्चातील शिवसैनिक हे परत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे न येता बी. रघुनाथ सभागृहाकडे पळाले व ''चला रे पालकमंत्र्यांची मीटिंग होऊ द्यायची नाही, हॉलमध्ये जाऊन मोडतोड करू'' असे ओरडून एकमेकांना उत्तेजित करत होते व घोषणा देत होते. फिर्यादी पोलीस अधिकारी हे त्यांना बी. रघूनाथ सभागृहाकडे जाऊ नका परत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे चला असे निर्देश दिले. परंतु कार्यकर्ते यांनी पोलिसांचे

कडे भेदून बी. रघुनाथ सभागृहाकडे निघाल्यावर पोलिसांनी तुमचा जमाव बेकायदेशीर आहे इथून निघून जा असा आदेश दिला. परंतु, जमाव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता त्यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना धक्काबुक्की केली, दगडफेक केली आणि बॅरिकेस् पाडून ते बी. रघुनाथ हॉलमध्ये घुसले त्या ठिकाणच्या खुर्च्या, टेबल ध्वनिक्षेपक साहित्याची मोडतोड केली ज्यामध्ये अंदाजे रु.१,२०,०००/– चे नुकसान झाले. शासकीय कामात अडथळा आणला घटनेमध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असल्याने नुकसान थांबवण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला. त्यामुळे पळापळी झाली. पांगा पांग होत असताना शिवसैनिकांनी शिवाजी पुतळ्याजवळ उभे असलेली आरोग्य खात्याची जिप क्र. एम एच २२ एन ३२२ चा काचा व हेडलाईट फोडून अंदाजे रू.१०,०००/– चे नुकसान केले. जमावातील ४० ते ५० लोक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर असलेले पोलीस अधिकारी यांची निर्देश न जुमानता पोलिसांचे कडे तोडून बेरिकेट्स पाडून जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात घुसले. त्यांनी काचेचे प्रवेशव्दार फोडले त्यामुळे रु.२०,०००/– चे नुकसान झाले. तसेच काही शिवसैनिकांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यालगत रस्ता रोको केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. त्यामुळे फिर्यादी यांनी चौकशी करून आमदार मीराताई रेंगे व इतर लोकांच्या विरुद्ध नवा मोंढा पोलीस स्टेशन, परभणी येथे त्याच दिवशी फिर्याद दिली.

३. फिर्यादीवरून गु.र. क्र. १६/२०१३ अन्वये वरील कलमांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला व त्याचा तपास एपीआय दराडे यांच्याकडे देण्यात आला आणि त्यांची बदली झाल्यानंतर उर्वरीत तपास हा ए.पी.आय. लांडगे यांनी केला आहे. तपासा दरम्यान त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा केला, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. पुढील तपास हा ए पी आय लांडगे यांचे कडे देण्यात आला त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदीचे आदेशाची प्रत हस्तगत केली, घटनास्थळाचे

फोटो हस्तगत केले, आरोपींना अटक करून तपासाअंती पुरावा मिळून आल्यामुळे त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

४. भादवि कलम ३५३ व ३३२ प्रमाणेचा गुन्हा हा सत्र न्यायालयात चालणारा असल्यामुळे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०७ व २०९ प्रमाणे पूर्तता करून प्रकरण हे सत्र न्यायालयात वर्ग केले. हे न्यायालय आमदार आणि खासदार यांच्या सत्र खटल्यांसाठी विशेष न्यायालय म्हणून गठित केलेले असल्यामुळे प्रस्तुत ची केस ही या न्यायालयात सत्र न्यायालय, परभणी येथून वर्ग करण्यात आली आहे.

५. आरोपींच्या विरुद्ध वरील कलमांअंतर्गत दोषारोप निशाणी ४४ वर ठेवण्यात आले आहेत. आरोपींनी आरोप नाकारून संपरीक्षेची तयारी दर्शवली. अभियोग पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. आरोपींनी संपूर्ण खटल्या दरम्यान तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ च्या जबाबा मध्ये त्यांच्याविरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप हे नाकारून केवळ आमदार मीराताई रेंगे आणि इतर आरोपी हे शिवसेना या विरोधी पक्षाचे असल्यामुळे राजकीय हेतूने प्रेरित होऊन त्यांच्याविरुद्ध खोटी केस केलेले आहे असा बचाव घेतला आहे.

६. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे विचार देतात मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमणेसह खालील प्रमाणे.

७- सरकार पक्षाचे प्रकरण व आरोपींचा बचाव पाहता खालीलप्रमाणे मुद्दे हे माझ्यासमोर विचाराधीन, असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २१/०१/२०१३ रोजी दुपारी १.१५ ते १.४५ वाजण्याच्या सुमारास बी. रघूनाथ सभागृह, वसमत रोड, परभणी व जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे आरोपी व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवली आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान च्या कलम १४३ खाली शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे काय? | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवली व दंगा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान च्या कलम १४७ खाली शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व इतर साक्षीदार हे शासकीय कर्तव्य पार पाडीत असतांना सर्व आरोपींनी इच्छापूर्वक ते सरकारी काम पार पाडत आहेत असे माहित असतांना देखिल त्यांच्या कामात अडथळा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३५३ सह कलम १४९ खाली शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | इतर साक्षीदार हे शासकीय कर्तव्य पार पाडीत असतांना सर्व आरोपींनी इच्छापूर्वक ते सरकारी काम पार पाडत आहेत असे माहित असतांना देखिल त्यांना दगडे फेकून मारले व त्यांच्या कामात अडथळा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३३२ सह कलम १४९ खाली शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे? | |
| ५. | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व इतर साक्षीदार हे शासकीय कर्तव्य पार पाडीत असतांना सर्व आरोपींनी मानवी जिवीत किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या निष्काळजीपणे किंवा हयगयीने दगडे फेकून मारली आणि त्यांच्या कामात अडथळा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३३६ सह कलम १४९ खाली शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| ६ | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सामूहिक उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवुन मालमत्तेला आगळीक करण्याच्या उद्देशाने पोलीसांची जिप क्र. एम एच २२ एन/३२२ चे काच ज्याची किंमत रु.१०,०००/-, बी रघुनाथ सभागृहाचे ध्वनीक्षेपक साहित्य व लाकडी सामानाचे अंदाजे रु.१,२०,०००/- व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशव्दारावरील काचेचा दरवाजा फोडून रू.२०,०००/- चे नुकसान केले | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ सह कलम १४९ खाली शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे? | |
| ७ | अभियोगपक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने व अन्य आरोपींनी सार्वजनिक मालमत्तेला आगळीक करण्याच्या उद्देशाने पोलीसांची जिप क्र. एम एच २२ एन/३२२ चे काच ज्याची किंमत रु.१०,०००/-, बी रघुनाथ सभागृहाचे ध्वनीक्षेपक साहित्य व लाकडी सामानाचे अंदाजे रु.१,२०,०००/- व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशव्दारावरील काचेचा दरवाजा फोडून रू.२०,०००/- चे नुकसान केले आणि त्याद्वारे कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा खाली शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| ८. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी सर्व आरोपींनी त्यांच्या सार्वजनिक उद्देशाने फिर्यादी व इतर साक्षीदारांना त्यांच्या कर्तव्यापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने किंवा योग्य कृती करण्याच्या अधिकारापासून किंवा त्यांच्या सरकारी कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण केला किंवा हिंसा केली आणि त्याद्वारे फौजदारी कायदा सुधारणा कायदा कलम ७ अन्वये शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| ९. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी, तुम्ही महाराष्ट्र पोलीस | |

| | | |
|---|---|---|
| | कायद्याच्या कलम ३७(१) अंतर्गत जारी केलेल्या आदेशाचे किंवा अधिसुचनेचे उल्लंघन केले आहे आणि त्याद्वारे महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अंतर्गत शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| १०. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक – १ ते ९**

८– दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाने घटनास्थळावरील पंच नंदकुमार श्रीधरराव टाकळकर (साक्षीदार क्र.१; निशाणी १०५) आणि पिंटू किशनराव बोकन (साक्षीदार क्रमांक ५; निशाणी ११६) यांना तपासलेले आहे. दोन्ही पंचांनी घटनास्थळ पंचनामा बद्दल अभियोग पक्षास पूरक अशी साक्ष न दिल्याने त्यांना फितुर घोषित करून उलट तपास घेण्यात आला. उलट तपासामध्ये सुद्धा अभियोग पक्षाला दोन्ही साक्षीदारांनी यांच्या समक्ष तपासणी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला ही बाब सिद्ध करता आलेली नाही. त्यामुळे घटनास्थळावरील दोन्ही पंचांची साक्ष ही अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

९. अभियोग पक्षाने घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सूर्यकांत शांतिनाथ अंभोरे साक्षीदार क्रमांक २ यांना निशाणी १०८ वर तपासलेले आहे. या साक्षीदाराने ते परभणी महानगरपालिकेचे वाहन घेऊन पेट्रोल भरण्यासाठी पेट्रोल पंपाकडे जात असताना जमावातील लोकांनी त्यांच्या गाडीवरती दगड फेकल्यामुळे समोरील विंड शिल्ड तुटली असे सांगितले आहे. परंतु, या साक्षीदाराने जमावातील कोणालाही ते ओळखत नाही असे स्पष्टपणे सांगितलेले आहे. त्यामुळे या साक्षीदाराचा पुरावा हा अभियोग पक्षाला

सदर जमावामध्ये आरोपी सहभागी होते आणि त्या बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाच्या पुष्ठ्यर्थ आरोपींनी बेकायदेशीर कृत्य केले, दगड फेकून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले ही बाब सिद्ध करता आली नाही.

१०. अभियोग पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर बंदोबस्तासाठी म्हणून नेमलेली पोलीस कर्मचारी अर्चना नरवडे साक्षीदार क्र. ६ निशाणी ११७ यांना तपासलेले आहे. या साक्षीदारांनी जमावाने दगड फेक केली व त्यामधील एक दगड त्यांच्या डाव्या हाताला लागला त्यामुळे त्या जखमी झाल्या तसेच इतरही पोलीस कर्मचारी दगडफेकीत जखमी झाले असे सांगितलेले आहे. त्यांनी पुढे पोलीस अधिकारी यांनी औषधोपचारासाठी शासकीय वाहनाने जिल्हा रुग्णालय, परभणी येथे पाठवले त्या ठिकाणी डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार करून त्यांना घरी पाठवले असे सांगितले आहे. या साक्षीदाराने जरी घटनेबद्दल व त्यांना घटने दरम्यान दगड लागल्यामुळे मार लागला तसेच इतर पोलीस कर्मचारी ही जखमी झाले असे सांगितले असले तरी त्यांनी स्पष्टपणे जमावातील लोकांना त्या ओळखत नाहीत असे सांगितले आहे. त्यांनी कोणत्याही आरोपीचे नाव त्यांच्या साक्षीपुराव्यात सांगितले नाही अथवा ज्या जमावाने दगडफेक केली त्यात ते सामील असले बद्दल सांगितलेले नाही. त्यामुळे याही साक्षीदाराची साक्षपुरावा हा अभियोग पक्षाला आरोपीच्या विरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्ध करण्यासाठी पुरेसा नाही.

११. अभियोग पक्षाने बी रघुनाथ हॉल येथील पहारेकरी माणिक खिलारे साक्षीदार क्रमांक ७ निशानी ११९ यांना घटनेच्या अनुषंगाने तपासलेले आहे. या साक्षीदाराने त्या दिवशी बी रघुनाथ सभागृह येथे त्यांची पहारेकरी म्हणून कर्तव्यावर होता. त्या दिवशी बी रघुनाथ सभागृहात पालकमंत्र्यांची जिल्हा बैठकीसाठी सभागृह उघडून दिले व त्यानंतर ते गेट वरती गेले असे सांगितले आहे. या साक्षीदारांनी बी रघुनाथ हॉलमध्ये गोंधळ झाला, त्या ठिकाणी खुर्च्या व साहित्य मोडतोड झाली असे

सांगितले आहे. परंतु सदर मोडतोड ही कोणी केली याबद्दल त्यांना काही माहिती नाही असे स्पष्टपणे सांगितलेले आहे. याशिवाय या साक्षीदाराने त्या बेकायदेशीर जमावांमध्ये आरोपी होते किंवा त्यांनी सहभाग घेतला होता असेही सांगितलेले नाही. त्यामुळे याही साक्षीदाराची साक्ष पुरावा अभियोग पक्षाला आरोपींच्या विरुद्ध केस सिद्ध करण्यासाठी पुरेसा नाही.

१२. सा.क्र.३ फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, काहीजण हे बी रघुनाथ हॉल कडे जात होते. परंतु त्यामध्ये आरोपी तत्कालीन आमदार श्रीमती रेंगे होत्या असे अथवा इतर आरोपी होते असे ते सांगत नाहीत. फिर्यादी यांनी जमाव बेकायदेशीर आहे तिकडे जाऊ शकणार नाही असे सांगत होते. त्यावेळेस त्या जमावात आरोपी आणि तत्कालीन आमदार श्रीमती रेंगे हजर होत्या असेही पुराव्यात अभिलेखावर आलेले नाही आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून त्यांच्या समान उद्देशाच्या पुष्ठ्यर्थ बी रघुनाथ हॉल जिल्हाधिकारी कार्यालय शिवाजी पुतळा या ठिकाणी जी मोडतोड दगडफेक आणि सार्वजनिक मालमत्तेची नुकसान केली अथवा रास्ता रोको करून लोकांना जाण्यास मज्जाव केला त्यामध्ये आरोपींचा सहभाग होता किंवा ते त्या ठिकाणी हजर होते असेही सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपीला भादवी कलम १४१ मधील समाईक उद्देशाच्या पुष्टी आरोपी हे एकत्र आले होते ही शाबीत झालेले नाही. त्यांनी काय कृती केली, शब्द वापरले याबद्दलही फिर्यादीमध्ये काही नमूद नाही, अथवा कोणताही साक्षीदार त्याबद्दल काहीही सांगत नाही. ज्या आरोपींनी बी रघुनाथ हॉलमध्ये पालकमंत्र्यांची सभा होऊ द्यायची नाही, मोडतोड करूया असे एकमेकासची चिथावणी देऊन घोषणा दिल्या व जाऊन मोडतोड केली, दगडफेक केली, पोलिसांचे आदेश मान्य केले नाहीत व बेकायदेशीर जमावाचा भाग होऊन सार्वजनिक शांततेचा भंग केला ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरून सिद्ध होत नाही.

१३. सा.क्र.३ फिर्यादीने त्याच्या उलट तपासात मोर्चासाठी परवानगी घेतली होती या बद्दल त्यांना निश्चित सांगता येणार नाही असे उत्तर दिले आहे. त्या अनुषंगाने तपासी अधिकारी यांनी ही मोर्चा परवानगी न घेता काढण्यात आला होता असे तपासामध्ये निष्पन्न झाले असे सांगितलेले नाही. त्यामुळे त्या दिवशी काढण्यात आलेला मोर्चा हा बेकायदेशीर होता किंवा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करणारा होता ही बाब सिध्द होत नाही. अभियोग पक्षाने जिल्हाधिकारी यांचा आदेशाचे जाहिर प्रगटन केले होते याबद्दलचा पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. सदरहू आदेश हा अभियोग पक्षाला सिध्द करता आलेला नाही. फिर्यादी यांनी आमदार मिराताई रेंगे या विरोधी पक्षाच्या आमदार होत्या हे कबुल केले आहे. फिर्यादी व तपासी अधिकारी यांना न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपींची नावे केवळ रेंगे वगळता सांगता आली नाहीत. सा.क्र.४ यांनी उलट तपासात असे कबुल केले आहे की, जमाव बी रघुनाथ सभागृहाकडे गेला, त्या ठिकाणी पालक मंत्र्यांची मिटींग चालू होती असे त्यांनी तपासी अधिकारी यांना दिलेल्या जवाबात सांगितलेले नव्हते. सा.क्र.८ यांनी मुदगल बंधा-यातुन पाणी सोडले त्याबाबत तपास केला नाही असे कबूल केले आहे. तसेच त्यांनी असे ही कबूल केले की जमावावर लाठीचार्ज करण्यात आला होता व त्याअनुषंगाने तपास केलेला नाही. त्यामुळे अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी हे मोर्चात होते तसेच त्यांनी बेकायदेशिर जमाव जमवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले, पोलीसांच्या आदेशाचे उल्लंघनकरून त्यांना शासकिय कामात अडथळा आणला त्यांना जखमी केले या बाबी सिध्द करता आल्या नाहीत. केवळ आरोपी मीराताई रेंगे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला एवढी बाब त्यांच्या विरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिवाडा **विजय पांडुरंग ठाकरे विरूध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र (ए.आय.आर २०१७ एस.सी. ८९७)** मधील प्रमाणानुसार पुरेशी नाही. सबब मी मुद्दा क्र.१ ते ९ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्रमांक १० ला अनुसरून खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) नुसार, कलम १४३, १४७, ३५३, ३३२, ३३६, ४२७ सह कलम १४९, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, कलम ७ फौजदारी कायदा सुधारणा कायदा व कलम १३५ मुंबई पोलीस कायदा च्या दंडनीय आरोपातुन निर्दोष सोडण्यात येते.

२. आरोपींचे जातमुलचके रद्द करण्यात येतात.

३. सदरील प्रकरणाचा अभिलेख हा फरारी आरोपी क्र. ३, ११, २७ व ३७ यांच्या विरुध्द प्रकरण चालवण्यासाठी जतन करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे या निकाला विरुध्द अपील किंवा प्रकरणाशी संबधी वरिष्ठ न्यायालयाची नोटीस आल्यानंतर तेथे हजर राहण्यासाठी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेची ऐपत असलेला जामीनदार द्यावा.

५. निकाल खुल्या न्यायालयात सांगीतला व घोषीत केला.

DINESH DATTATRAYA KURULKAR

Digitally signed by DINESH DATTATRAYA KURULKAR
Date: 2025.11.24 14:49:58 +0530

**( डी. डी. कुरुलकर )**

**दिनांकः २०/११/२०२५.** **अति.सत्र न्यायाधीश, गंगाखेड.**